# मुंबई मेट्रो : वरळीत २५ व्या टप्प्याचे भुयारीकरण पूर्ण

## आदित्य ठाकरेंच्या उपस्थितीत मेट्रो कर्मचाऱ्यांचा जल्लोष



मुंबई - मेट्रो-३ प्रकल्पाच्या २५ व्या भुयारीकरणाचा टप्पा बुधवारी वरळीत पूर्ण झाला. पर्यावरण आणि पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यावेळी उपस्थित होते. भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांनी जल्लोष करत आनंद साजरा केला.

मुंबई मेट्रो- ३ ही (कुलाबा ते सीप्झ) देशातील पहिली भुयारी मेट्रो आहे. वरळी सायन्स सेंटरपासून दूरदर्शन या अतिशय वर्दळीच्या परिसरात २.७ किलोमीटरचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. मुंबईच्या उदरात जवळपास ६० ते ७० मीटर खोल हे भुयारीकरणाचे काम सुरू आहे. कुलाबा ते सीप्झ या संपूर्ण भुयारी मार्गावर एकूण २६ स्थानके असून, त्यापैकी १३ स्थानकांचे १०० टक्के खोदकाम पूर्ण झाले, तर उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम यावर्षीच्या मे महिन्यापर्यंत पूर्ण होईल, असे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले आहे.

### १०० टक्के खोदकाम पूर्ण झालेली स्थानके

कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, सायन्स म्युझियम, सिद्धीविनायक, एमआयडीसी, मरोळ नाका, सहार रोड, सीएसएमआयए-आंतरदेशीय, सीएसएमआयए-आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सीप्झ या स्थानकांचा समावेश आहे.